## संक्षिप्त

**बिस्वनाथ (आसाम) : तीन दिवसांच्या आसाम दौर्‍यावर असलेल्या काँग्रेस सरचिटणीस प्रियांका गांधी-वधेरा यांनी मंगळवारी येथील चहाच्या मळ्यात शेतकरी महिलांशी संवाद साधत त्यांच्यासमवेत चहाची पाने खुडण्याचे कामही केले.**

### बंगालमध्ये पंतप्रधान मोदी २० तर शहा, नड्डा प्रत्येकी ५० सभा घेणार

**नवी दिल्ली :** विधानसभा होऊ घातलेल्या पाच राज्यांमध्ये प्रचारार्थ भाजप नेत्यांनी कंबर कसली आहे. बंगाल तसेच आसाममध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी अनेक सभांच्या माध्यमातून मतदारांना भाजपला मत देण्याचे आवाहन करतील. मोदी बंगालमध्ये २० सभा तर आसाममध्ये सहा सभांना संबोधित करतील. ७ मार्चला कोलकाता येथील ब्रिगेड मैदानातून पंतप्रधान भाजपच्या प्रचारार्थ जाहीर सभांचा धडाका सुरू करतील. गृहमंत्री अमित शहा, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा बंगालमध्ये प्रत्येकी ५० सभांना संबोधित करतील.

### खा. नंदकुमार चौहान यांचे कोरोनाने निधन

**नवी दिल्ली :** मध्य प्रदेशातील खंडवा लोकसभा मतदारसंघाचे भाजप खासदार नंदकुमार चौहान यांचे सोमवारी रात्री निधन झाले. ११ जानेवारी रोजी त्यांना कोरोनाचे निदान झाल्यानंतर त्यांना मेदान्ता रुग्णालयात दाखल केले होते. चौहान यांनी राजकीय कारकिर्दीची सुरुवात शाहपूर नगरपालिकेपासून केली. १९७८ ते ८० तसेच १९८३ ते ८७ या काळात ते शाहपूरचे नगराध्यक्ष होते. यानंतर सलग दोनवेळा बुरहानपूरमधून विधानसभेवर निवडून गेले होते. १९९६, १९९८ व १९९९ आणि २००४ मध्ये खंडवामधून ते लोकसभेत निवडून गेले. २०१४ व २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी पुन्हा विजय मिळवला होता.

### लोकसभा-राज्यसभा टीव्हीचे विलीनीकरण

**नवी दिल्ली :** लोकसभा आणि राज्यसभा या वाहिन्यांचे विलीनीकरण करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला असून संसदेचे कामकाज पाहण्यासाठी आता दोन टीव्ही चॅनेल बदलण्याची गरज भासणार नाही, तर एकाच 'संसद टीव्ही' या चॅनेलवर हे कामकाज पाहता येईल. लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला तसेच राज्यसभेचे सभापती एम. वेंकय्या नायडू यांच्या दरम्यान झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली. सेवानिवृत्त आयएएस अधिकारी रवी कपूर यांच्याकडे 'संसद टीव्ही'ची जबाबदारी देण्यात आली आहे.

# वाळूला पर्याय न शोधल्याने अराजकाची स्थिती!

## हरित लवादाने यापूर्वीही दिला होता उपसाबंदीचा इशारा; कृत्रिम वाळूच्या पर्यायाचाही भविष्यात फेरविचार आवश्यक

**कोल्हापूर : सुनील कदम**

काळाची पावले ओळखून शासनाने आणि प्रामुख्याने बांधकाम क्षेत्राने नैसर्गिक वाळूला सक्षम पर्याय न शोधल्यामुळे आज वाळूच्या बाबतीत अराजकाची स्थिती निर्माण झाल्याचे दिसत आहे. सध्या जे पर्याय शोधलेले दिसताहेत, त्यालाही काळानुसार मर्यादा पडून अन्य पर्याय शोधावे लागणार आहेत.

राष्ट्रीय हरित लवादाने वाळू उपशामुळे राज्यातील नद्यांची होत असलेली अपरिमित हानी, धोक्यात आलेली जैवविविधता, नद्यांच्या भूरचनेत होणारा संभाव्य बदल आदी बाबी २०१३ मध्येच राज्य शासनाच्या निदर्शनास आणून दिल्या होत्या. त्याचप्रमाणे राज्यातील वाळू उपशावर कठोर निर्बंध लादण्याच्या सूचनाही केल्या होत्या. शिवाय भविष्यात वाळू

**वाळू समस्या : ३**

उपसा करण्यापूर्वी हरित लवादाच्या परवानगीची अटही लादली होती; मात्र नेहमीप्रमाणे राज्य शासनाने याकडे दुर्लक्ष केले आणि वाळू उपसा अविरत सुरूच राहिला. काही स्वयंसेवी संघटनांनी हरित लवादाकडे धाव घेतल्यानंतर त्याची दखल घेऊन लवादाने एप्रिल २०१७ मध्ये राज्यातील वाळू उपशावर बंदी घातली.

लवादाने सुरुवातीलाच दिलेल्या इशार्‍याची गंभीर दखल घेऊन राज्य शासनाने नैसर्गिक वाळूला सक्षम

- **लवादाच्या इशार्‍याकडे शासनाचा कानाडोळा**
- **वाळूबाबत अजूनही नाही स्पष्ट धोरण**
- **नैसर्गिक वाळूला मागणी असल्याने तस्करी जोमात**

पर्याय शोधला असता, तर वाळूसाठी अराजक माजले नसते. नैसर्गिक वाळू सहजासहजी उपलब्ध होणार नाही, ही बाब अधोरेखित झाल्यानंतर बांधकाम क्षेत्रातील मंडळी पर्यायी वाळूच्या शोधाला लागली आणि त्यातून पहिल्यांदाच २०१७ मध्ये कृत्रिम वाळूचा पर्याय पुढे आला. मात्र याबाबतीतही निर्णय घ्यायला शासनाला दोन वर्षे लागली.

### परदेशातून वाळू आयात, किती खरी किती खोटी!

वाळू उपसाबंदीनंतर राज्य शासनाने वाळूची गरज भागविण्यासाठी परदेशातून वाळू आयातीची घोषणा केली होती; मात्र यातील व्यावहारिकदृष्ट्या फोलपणा तेव्हाच स्पष्ट झाला होता. श्रीलंका, बांगलादेश, म्यानमार, मलेशिया या देशांमधील वाळू आयातीचा खर्च विचारात घेता ही वाळू सोन्याच्या भावाने पडली असती. त्यामुळे सद्य:स्थितीत तरी कृत्रिम वाळूशिवाय पर्याय दिसत नाही.

२०१९ मध्ये शासनाने खास अध्यादेश काढून शासकीय बांधकामात २० टक्क्यांपर्यंत कृत्रिम वाळूचा वापर करायचा अध्यादेश काढला; मात्र उर्वरित ८० टक्के वाळूची तजवीज कशी करायची, याची या अध्यादेशात स्पष्टता नव्हती. त्यामुळे सहा महिन्यांनी पुन्हा नवीन अध्यादेश काढून शासकीय बांधकामात १०० टक्के कृत्रिम वाळूचा वापर करण्याचा निर्णय घेतला; मात्र खासगी बांधकामांना लागणार्‍या वाळूचे नियोजन कसे करायचे, याचा त्यामध्ये उल्लेखच नव्हता. अखेर बांधकाम क्षेत्रातील काही मंडळींनी आणि व्यावसायिकांनी कृत्रिम वाळूचा पर्याय स्वीकारल्यामुळे राज्यात आज-काल मोठ्या प्रमाणात कृत्रिम वाळूचा वापर सुरू झाला आहे. हा वापरदेखील १०० टक्के नाही. आजही मोठ्या प्रमाणात नैसर्गिक वाळूला मागणी असून परिणामी वाळू तस्करीही जोमाने सुरू आहे.

> अन्य राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्राचा शहरीकरणाचा वेग जास्त आहे. २०१७-१८ मध्ये महाराष्ट्रात शहरीकरणाची टक्केवारी ४५.२ होती. ती २०३० पर्यंत ५८ टक्के होऊ शकते. हरित लवादाने वाळू उपसा बंदी लादताना राज्यातील नागरीकरणाचा वेग विचारात घेऊन काही तरी ठोस पर्याय द्यायला हवा होता. कारण, या निर्णयाचा शहरीकरणावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे.
> **- मोहन यादव**
> निवृत्त नगररचना संचालक

# महिला सबलीकरणासाठी 'फिनोलेक्स'चे उल्लेखनीय काम

**कोल्हापूर :** जागतिक महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेडने मुकुल माधव फाऊंडेशन (एमएमएफ) या सीएसआर पार्टनरसोबत मिळून केलेल्या कामावर दृष्टिक्षेप टाकला आहे.

एमएमएफ २ दशकांपासून आरोग्य, शिक्षण, पाणी संवर्धन, स्वच्छता या क्षेत्रांत कार्यरत आहे. विशेषतः स्त्री आरोग्य, स्त्री शिक्षण, स्त्रियांना रोजगार या क्षेत्रांत विविध घटकांच्या सहकार्याने परिणामकारक काम केले आहे. यामुळे उस्मानाबाद येथील ६० टक्के महिला शेतकर्‍यांना कर्जाची परतफेड करून मुलांच्या शिक्षणाला पाठबळ देता आले. ३१२ विधवा शेतकर्‍यांना पीक काढणीनंतर पिक विक्रीचे तंत्र, माती परीक्षण यांचे प्रशिक्षण दिले. यासाठी एमएमएफला कृषी विज्ञान केंद्र आणि माजी कृषिमंत्री चंद्रकांत पाटील यांचे सहकार्य लाभले. पाटील यांनी प्रत्येकी ३० किलो सोयाबीन आणि १५ किलो तूर पेरणीसाठी दिले.

ग्रामीण भागातील १०० महिलांना शेती तंत्र आणि उत्पादनवाढीबाबतचे प्रशिक्षण दिले. या शंभर महिलांनी नंतर १००० महिलांना प्रशिक्षित केले. पालघरमध्ये आदिवासी महिलांसाठी ५०० हून अधिक शौचालये उभारली गेली. याशिवाय एचआयव्हीबाधितांना शिलाई मशिन वाटप आणि वारांगणांसाठी धान्य वाटप केले. ३० महिलांना पुणे गर्ल्स कॉलेज, आयटीआयच्या माध्यमातून प्लंबिंगचे प्रशिक्षण दिले. जुन्नर येथे आजीबाईची शाळा या उपक्रमात १०० ज्येष्ठ महिलांनी शालेय शिक्षणाचे धडे गिरवले, तर सोलापुरात १०० मुलींना सायकल वाटप केले. विश्वस्त सौ. रितू प्रकाश छाब्रिया म्हणाल्या, समविचारी घटकांसोबत मिळून आणखीही खूप काम करायचे आहे. खेड्यापाड्यात सकारात्मक बदल घडविण्याची क्षमता एमएमएफची आहे.

# 'कॅटरपिलर'चे ५० व्या वर्षात पदार्पण

**कोल्हापूर :** बांधकाम आणि खाण उद्योगातील उपकरणांची उत्पादने, डिझेल आणि नैसर्गिक वायू इंजिन्स, औद्योगिक गॅस टर्बाईन्स आणि डिझेल-इलेक्ट्रिक स्वयंचलित यंत्रांच्या उत्पादनात अग्रेसर असलेल्या कॅटरपिलर कंपनीने भारतातील उत्पादन क्षेत्रात ५० व्या वर्षात पदार्पण केले आहे.

तंत्रज्ञानाचा वापर आणि सुरक्षितता, उत्पादनक्षमता, परिणामकारकतेसाठी कंपनीच्या उत्पादनांची ओळख आहे. ९५ वर्षांपासून कंपनी कार्यरत असून जगभरातील १९३ देशांमध्ये कंपनीचा कारभार आहे. तर जगभरात जवळपास १ लाख ६० हजार कर्मचारीही आहेत. भारतात कंपनी १९३० पासून कार्यरत आहे. सहा राज्यांमध्ये उत्पादन सुविधा, दोन संशोधन आणि विकास केंद्रे, पाच सबसिडायरी, ८ कॅटरपिलर ब्रँड्स, ११ हजार डिलर असा कंपनीचा विस्तार आहे.

कंपनीचे चेअरमन आणि सीईओ जिम अंमप्लेबी म्हणाले की, गेल्या काही दशकांपासून कॅटरपिलर ही भारताच्या विकासाचा भाग राहिली आहे. गेली अनेक वर्षे या देशाच्या प्रगतीचा साक्षीदार असणे हे कंपनीचे मोठे यशच आहे.

कॅटरपिलर इंडियाचे कंट्री मॅनेजर बन्सी फणसाळकर म्हणाले, कंपनी भारतातील उत्पादन निर्मितीत ५० व्या वर्षात पदार्पण करत आहे. १९४८ मध्ये भाक्रा नानगल धरणाच्या उभारणीतही कंपनीची उत्पादने वापरली गेली होती. कंपनीने बांधकाम, खाणउद्योग, वाहतूक, वीज निर्मिती आणि पायाभूत सुविधा निर्मितीतील विकासात मदत केली आहे. कंपनी या क्षेत्रातील उपकरणांच्या उत्पादनांची देशातील सर्वात मोठी निर्यातदारही आहे.

# महाराष्ट्राचा कोरोना पॉझिटिव्हिटी दर सर्वाधिक

**नवी दिल्ली : पुढारी वृत्तसेवा**

देशात सध्या सरासरी २ टक्के पॉझिटिव्हिटी दराने कोरोनाबाधित आढळत आहेत. धक्कादायक बाब म्हणजे महाराष्ट्रात गेल्या आठवड्याभरात १०.०२ टक्के पॉझिटिव्हिटी दराने कोरोना रुग्ण आढळले. भारतातील ६ राज्ये, केंद्रशासित प्रदेशांचा कोरोना पॉझिटिव्हिटी दर हा राष्ट्रीय सरासरीच्या तुलनेत अधिक असल्याने चिंता व्यक्त केली जात आहे.

महाराष्ट्रापाठोपाठ केरळ ४.५७ टक्के, गोवा ३.९०, चंदीगड ३.१६, पंजाब २.३७, तसेच गुजरातचा पॉझिटिव्हिटी दर २.०४ टक्के आहे. असे असले, तरी देशातील कोरोनाबाधित वाढीच्या वेगाला थोडी खीळ बसल्याचे दिसून आले आहे. गेल्या २४ तासांत १२ हजार २८६ कोरोना रुग्णांची भर पडली, तर ९१ मृत्यू झाले. महाराष्ट्रात सर्वाधिक ६३९७, केरळ १९३८, पंजाब ६३३, तामिळनाडू ४७४, तसेच कर्नाटकमध्ये ३४९ कोरोनाबाधित आढळले, तर महाराष्ट्रात ३०, पंजाब १८, केरळ १३, छत्तीसगड ७, तसेच तामिळनाडू, कर्नाटकमध्ये प्रत्येकी ५ मृत्यू झाले. दिलासादायक बाब म्हणजे सोमवारी दिवसभरात १२ हजार ४६४ रुग्णांनी कोरोनावर मात केली.

देशातील एकूण कोरोना रुग्णांची संख्या १ कोटी ११ लाख २४ हजार ५२७ झाली आहे. यातील १ कोटी ७ लाख ९८ हजार ९२१ रुग्ण कोरोनामुक्त झाले आहेत, तर १ लाख ६८ हजार ३५८ रुग्णांवर (१.५१ टक्के) उपचार सुरू आहेत. आतापर्यंत १ लाख ५७ हजार २४८ रुग्णांचा मृत्यू झाला आहे.


महाराष्ट्र राज्य लॉटरी
**महाराष्ट्र गजलक्ष्मी** मंगळ वीकली लॉटरी — सोडत सायं. 4:45 वाजता
सोडत दर मंगळवार • सोडत क्रमांक 09 • तिकिट किं. रु.20/- • सोडत दिनांक 02/03/2021
पहिले सामाईक बक्षिस रु. 10000/- GL-03 : 1537
दुसरे बक्षिस रु. 1000/- सर्व मालिकांसाठी

| 1000/- सर्व मालिकांसाठी | | | | |
|---|---|---|---|---|
| | 1172 | 1881 | 2651 | 3230 |
| 1011 | 1207 | 1988 | 2728 | 3368 |
| 1051 | 1229 | 2189 | 2999 | 3397 |
| | 1541 | 2210 | 3031 | 3414 |
| 1055 | 1610 | 2259 | 3075 | 3517 |
| 1084 | 1660 | 2277 | 3136 | 3559 |
| 1155 | 1671 | 2586 | 3148 | 3730 |

जिंकले! जिंकले!! आजच्या सोडतीत रु.1000x5 = रु.5000 ची अंदाजित 26 बक्षिसे जिंकली
छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

निकाल **गणेशलक्ष्मी** शुभ विकली लॉटरी — सोडत संध्या. 5:00
सोडत दर मंगळवार • सोडत क्रमांक 09 • तिकिट किं. रु.10/- • सोडत दिनांक 02/03/2021
पहिले बक्षिस रु. 10000/- जिंकले MG07 : 4408 प्रिन्स लॉटरी सेंटर अँड जनरल स्टोअर्स - कल्याण
सर्व मालिकांसाठी • सर्व मालिकांसाठी — बक्षिस
दुसरे बक्षिस रु. 5000/- जिंकले 3382 रु 5000 ची 5 बक्षिसे जिंकली — रु 5000 ची 5 बक्षिसे जिंकली: श्री सिद्धि समर्थ एजेंसी, दादर - मुंबई (5 बक्षिसे)
तिसरे बक्षिस रु. 2000/- जिंकले 2476 रु 2000 ची 10 बक्षिसे जिंकली — रु 2000 ची 10 बक्षिसे जिंकली: श्री गणेश एन्टरप्रायझेस - दादर, मुंबई (5 बक्षिसे), किशोर लॉटरी सेंटर, सांगली (5 बक्षिसे)
चौथे बक्षिस रु. 1000/- जिंकले 3727 रु 1000 ची 5 बक्षिसे जिंकली — रु 1000 ची 5 बक्षिसे जिंकली: श्री गणेश एन्टरप्रायझेस - दादर, मुंबई (5 बक्षिसे)
पाचवे बक्षिस रु. 400/- सर्व मालिकांसाठी — पाचवे बक्षिस रु. 400/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1478 | 2111 | 2682 | 3346 | 4147 | 5055 | 6378 |
| | | 1515 | 2236 | 2757 | 3625 | 4149 | 5091 | 6506 |
| | | 1540 | 2241 | 2828 | 3636 | 4243 | 5251 | 6604 |
| | 1141 | 1595 | 2320 | 2921 | 3708 | 4749 | 5553 | 6627 |
| 1001 | 1151 | 1912 | 2326 | 2978 | 3792 | 4842 | 5607 | 6636 |
| 1017 | 1331 | 1913 | 2376 | 3036 | 3908 | 4942 | 5751 | 6877 |
| 1093 | 1408 | 1917 | 2432 | 3202 | 3990 | 4962 | 5998 | 6938 |
| 1135 | 1417 | 2107 | 2645 | 3286 | 4093 | 4996 | 6317 | 6994 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

महाराष्ट्र राज्य लॉटरी **पद्मिनी** विकली लॉटरी — सोडत दर मंगळवारी — तिकिट किंमत रु. 50/- — सोडत क्र. 09 सोडत दिनांक 02/03/2021
पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख — PM-04 - 6168
उत्तेजनार्थ बक्षिस रु. 5000/- — पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी 6168 — श्री गणेश एन्टरप्रायझेस - दादर, मुंबई; अंबिका एजन्सी - दादर, मुंबई; डायमंड कॉर्पोरेशन - बोरिवली; महावीर लॉटरी सेंटर - कोल्हापूर (2 बक्षिसे)
सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 1642 | 1747 | 2032 | 2557 | 3297 | 4750 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 2325 | 2587 | 4107 | 4217 | 5500 | 6544 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 1034 | 2804 | 4857 | 5034 | 5855 | 5951 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 1944 | 2140 | 2784 | 3664 | 5794 | 6390 |

रु. 100/- (सर्व मालिकांसाठी) — सहावे बक्षिस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1901 | 2222 | 2589 | 2994 | 3374 | 3799 | 4243 | 4601 | 5108 | 5516 | 6028 | 6569 |
| | | 1911 | 2223 | 2593 | 2997 | 3383 | 3817 | 4244 | 4604 | 5114 | 5524 | 6042 | 6571 |
| 1001 | 1354 | 1913 | 2232 | 2601 | 3003 | 3395 | 3820 | 4256 | 4620 | 5124 | 5539 | 6049 | 6576 |
| 1011 | 1369 | 1914 | 2239 | 2621 | 3014 | 3397 | 3826 | 4261 | 4648 | 5133 | 5558 | 6065 | 6618 |
| 1030 | 1376 | 1916 | 2270 | 2626 | 3031 | 3403 | 3837 | 4273 | 4654 | 5159 | 5575 | 6069 | 6619 |
| 1039 | 1390 | 1917 | 2277 | 2628 | 3032 | 3406 | 3839 | 4286 | 4692 | 5168 | 5576 | 6076 | 6621 |
| 1077 | 1395 | 1942 | 2285 | 2652 | 3034 | 3412 | 3852 | 4288 | 4727 | 5175 | 5580 | 6077 | 6636 |
| 1087 | 1416 | 1969 | 2292 | 2657 | 3039 | 3426 | 3874 | 4330 | 4740 | 5188 | 5582 | 6096 | 6654 |
| 1093 | 1431 | 1971 | 2295 | 2662 | 3046 | 3428 | 3877 | 4334 | 4746 | 5223 | 5585 | 6121 | 6683 |
| 1101 | 1435 | 1984 | 2296 | 2667 | 3051 | 3430 | 3883 | 4335 | 4774 | 5225 | 5588 | 6128 | 6688 |
| 1104 | 1463 | 1991 | 2314 | 2679 | 3103 | 3434 | 3889 | 4337 | 4779 | 5259 | 5591 | 6134 | 6693 |
| 1108 | 1471 | 2006 | 2317 | 2702 | 3130 | 3463 | 3901 | 4368 | 4794 | 5266 | 5592 | 6145 | 6695 |
| 1117 | 1481 | 2007 | 2320 | 2704 | 3137 | 3467 | 3933 | 4378 | 4808 | 5289 | 5593 | 6147 | 6696 |
| 1119 | 1501 | 2022 | 2326 | 2708 | 3140 | 3490 | 3934 | 4395 | 4829 | 5299 | 5595 | 6172 | 6734 |
| 1123 | 1512 | 2023 | 2356 | 2709 | 3157 | 3496 | 3935 | 4401 | 4834 | 5306 | 5635 | 6176 | 6768 |
| 1126 | 1542 | 2025 | 2362 | 2712 | 3173 | 3509 | 3953 | 4411 | 4842 | 5331 | 5658 | 6191 | 6777 |
| 1136 | 1557 | 2026 | 2382 | 2725 | 3187 | 3531 | 3956 | 4414 | 4843 | 5336 | 5751 | 6252 | 6804 |
| 1139 | 1564 | 2041 | 2410 | 2728 | 3191 | 3542 | 3973 | 4433 | 4845 | 5352 | 5775 | 6257 | 6807 |
| 1148 | 1579 | 2043 | 2421 | 2748 | 3210 | 3554 | 3983 | 4440 | 4846 | 5370 | 5777 | 6262 | 6833 |
| 1152 | 1585 | 2049 | 2424 | 2751 | 3234 | 3557 | 3998 | 4444 | 4847 | 5375 | 5787 | 6276 | 6836 |
| 1156 | 1613 | 2058 | 2439 | 2759 | 3236 | 3587 | 4042 | 4445 | 4848 | 5399 | 5791 | 6278 | 6839 |
| 1160 | 1701 | 2069 | 2440 | 2764 | 3239 | 3605 | 4044 | 4448 | 4864 | 5425 | 5799 | 6283 | 6862 |
| 1162 | 1703 | 2077 | 2442 | 2768 | 3256 | 3632 | 4048 | 4451 | 4894 | 5435 | 5828 | 6285 | 6865 |
| 1177 | 1713 | 2097 | 2445 | 2769 | 3258 | 3661 | 4065 | 4458 | 4908 | 5445 | 5850 | 6310 | 6868 |
| 1179 | 1715 | 2111 | 2452 | 2770 | 3262 | 3685 | 4071 | 4460 | 4909 | 5456 | 5859 | 6326 | 6876 |
| 1181 | 1748 | 2121 | 2462 | 2828 | 3283 | 3707 | 4082 | 4467 | 4924 | 5457 | 5883 | 6331 | 6878 |
| 1221 | 1752 | 2138 | 2471 | 2837 | 3318 | 3729 | 4095 | 4473 | 4944 | 5460 | 5885 | 6389 | 6888 |
| 1286 | 1760 | 2148 | 2490 | 2897 | 3322 | 3733 | 4107 | 4480 | 4958 | 5464 | 5889 | 6418 | 6896 |
| 1287 | 1781 | 2151 | 2504 | 2900 | 3329 | 3736 | 4114 | 4484 | 4974 | 5469 | 5908 | 6432 | 6897 |
| 1302 | 1817 | 2161 | 2508 | 2909 | 3330 | 3765 | 4115 | 4486 | 4976 | 5472 | 5912 | 6437 | 6971 |
| 1311 | 1818 | 2166 | 2509 | 2910 | 3346 | 3766 | 4128 | 4488 | 5008 | 5477 | 5950 | 6472 | 6972 |
| 1314 | 1850 | 2169 | 2514 | 2925 | 3362 | 3771 | 4135 | 4501 | 5016 | 5478 | 5951 | 6487 | 6975 |
| 1325 | 1868 | 2183 | 2528 | 2929 | 3363 | 3773 | 4145 | 4509 | 5031 | 5483 | 5955 | 6524 | 6976 |
| 1348 | 1872 | 2212 | 2548 | 2949 | 3364 | 3788 | 4152 | 4544 | 5051 | 5494 | 5958 | 6525 | 6982 |
| 1349 | 1881 | 2216 | 2551 | 2962 | 3372 | 3793 | 4154 | 4564 | 5056 | 5503 | 5969 | 6561 | 6995 |
| 1351 | 1883 | 2218 | 2585 | 2975 | 3373 | 3795 | 4216 | 4589 | 5072 | 5512 | 6020 | 6563 | 6998 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

महाराष्ट्र राज्य लॉटरी
**महाराष्ट्र सह्याद्री** महालक्ष्मी विकली लॉटरी — सोडत सायं. 5:15 वाजता
सोडत दर मंगळवार • सोडत क्रमांक 09 • तिकिट किं. रु.12/- • सोडत दिनांक 02/03/2021
पहिले सामाईक बक्षिस रु. 10000/- जिंकले SM-07 : 1481 जैनी एजन्सी, घाटकोपर
दुसरे बक्षिस रु. 700/- सर्व मालिकांसाठी

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1095 | 1679 | 2272 | 2585 | 3443 |
| 1239 | 1688 | 2302 | 2684 | 3447 |
| 1292 | 1814 | 2423 | 2688 | 3457 |
| 1411 | 1956 | 2475 | 2826 | 3487 |
| 1431 | 1981 | 2482 | 2828 | 3490 |
| 1540 | 2060 | 2550 | 3158 | 3559 |

जिंकले! जिंकले!! आजच्या सोडतीत रु.700x5 = रु.3500 ची अंदाजित 38 बक्षिसे जिंकली
छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

मिझोरम राज्य सरकार
**राजश्री** 250 मंथली लॉटरी — Draw No. 3 Dt: 2-3-2021 5.00 pm Ticket Rs.250/-

| | A | B | C | D | E |
|---|---|---|---|---|---|
| 1st Prize ₹ 10 लाख | 15165 | 29624 | 13764 | 24747 | 27263 |
| 2nd Prize ₹ 1 लाख | 13601 | 24484 | 15369 | 29167 | 26127 |

3rd Prize ₹ 9000/- Common to all Series
10611 14012 14249 15383 21801 22467 22789 25548 29010 29877
4th Prize ₹ 5000/- Common to all Series
0063 2253 2685 3366 4161 4886 4907 4992 5751 7066
5th Prize ₹ 3000/- Common to all Series
2868 3221 3993 5527 7300 7542 8495 8898 9155 9298
6th Prize ₹ 2000/- Common to all Series
0016 0434 1116 2854 4069 4684 5134 5647 6369 7137 7775 9227 9855
0218 0549 2775 3168 4514 5066 5347 5666 6717 7487 9188 9395
7th Prize ₹ 1000/- Common to all Series
0478 1903 3235 4013 4544 5686 6248 6836 7083 7619
8381 8743 9669 0699 2311 3356 4016 4720 5952 6575
6882 7131 7700 8497 8814 9682 0993 2348 3932 4409
4865 6047 6603 6887 7289 8082 8635 9420 1388 2375
3965 4439 5431 6101 6721 7080 7345 8090 8649 9427
8th Prize ₹ 500/- Common to all Series

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 0000 | 0662 | 1265 | 2104 | 2829 | 3730 | 4462 | 5113 | 5813 | 6562 | 7299 | 7930 | 8389 | 8982 | 9574 |
| 0062 | 0685 | 1269 | 2152 | 2877 | 3739 | 4503 | 5192 | 5860 | 6576 | 7310 | 7969 | 8392 | 8989 | 9609 |
| 0069 | 0707 | 1271 | 2168 | 2886 | 3756 | 4523 | 5203 | 5871 | 6584 | 7314 | 7975 | 8415 | 9002 | 9615 |
| 0075 | 0817 | 1290 | 2188 | 2904 | 3789 | 4549 | 5229 | 5872 | 6600 | 7317 | 7976 | 8423 | 9009 | 9619 |
| 0105 | 0819 | 1311 | 2205 | 2922 | 3791 | 4563 | 5237 | 5877 | 6651 | 7333 | 7983 | 8431 | 9022 | 9639 |
| 0108 | 0820 | 1344 | 2220 | 2941 | 3821 | 4591 | 5245 | 5888 | 6654 | 7357 | 8003 | 8445 | 9025 | 9646 |
| 0112 | 0837 | 1372 | 2229 | 3020 | 3834 | 4604 | 5256 | 5901 | 6698 | 7378 | 8041 | 8452 | 9026 | 9653 |
| 0119 | 0839 | 1428 | 2283 | 3050 | 3837 | 4623 | 5260 | 5906 | 6726 | 7393 | 8043 | 8467 | 9049 | 9690 |
| 0235 | 0862 | 1438 | 2298 | 3091 | 3877 | 4639 | 5272 | 5965 | 6735 | 7396 | 8053 | 8496 | 9095 | 9694 |
| 0243 | 0909 | 1449 | 2308 | 3107 | 3902 | 4645 | 5282 | 5986 | 6750 | 7409 | 8057 | 8534 | 9112 | 9720 |
| 0249 | 0913 | 1485 | 2310 | 3119 | 3912 | 4652 | 5292 | 5991 | 6755 | 7457 | 8072 | 8537 | 9146 | 9795 |
| 0252 | 0918 | 1512 | 2335 | 3120 | 3952 | 4677 | 5335 | 5995 | 6814 | 7458 | 8077 | 8582 | 9149 | 9796 |
| 0255 | 0944 | 1536 | 2366 | 3135 | 3967 | 4688 | 5343 | 6006 | 6846 | 7483 | 8098 | 8604 | 9168 | 9797 |
| 0289 | 0963 | 1537 | 2415 | 3152 | 3986 | 4739 | 5348 | 6014 | 6869 | 7525 | 8106 | 8619 | 9224 | 9808 |
| 0293 | 0975 | 1658 | 2427 | 3196 | 4035 | 4765 | 5382 | 6033 | 6950 | 7535 | 8119 | 8624 | 9257 | 9822 |
| 0294 | 0994 | 1678 | 2433 | 3199 | 4040 | 4824 | 5416 | 6036 | 6954 | 7558 | 8138 | 8639 | 9288 | 9832 |
| 0349 | 1020 | 1690 | 2448 | 3200 | 4073 | 4838 | 5550 | 6046 | 6964 | 7578 | 8139 | 8665 | 9296 | 9836 |
| 0350 | 1022 | 1719 | 2453 | 3227 | 4114 | 4845 | 5569 | 6053 | 7011 | 7583 | 8142 | 8714 | 9325 | 9841 |
| 0363 | 1037 | 1732 | 2517 | 3264 | 4153 | 4857 | 5574 | 6085 | 7036 | 7588 | 8178 | 8738 | 9331 | 9887 |
| 0364 | 1041 | 1738 | 2620 | 3305 | 4173 | 4870 | 5590 | 6095 | 7049 | 7622 | 8179 | 8772 | 9350 | 9891 |
| 0380 | 1058 | 1751 | 2642 | 3358 | 4195 | 4897 | 5605 | 6116 | 7067 | 7655 | 8180 | 8779 | 9352 | 9901 |
| 0416 | 1073 | 1752 | 2647 | 3384 | 4221 | 4909 | 5620 | 6128 | 7074 | 7657 | 8188 | 8796 | 9382 | 9902 |
| 0420 | 1076 | 1767 | 2676 | 3397 | 4272 | 4936 | 5639 | 6148 | 7096 | 7667 | 8191 | 8851 | 9388 | 9941 |
| 0424 | 1097 | 1826 | 2693 | 3435 | 4273 | 4950 | 5660 | 6219 | 7101 | 7675 | 8238 | 8864 | 9423 | 9995 |
| 0447 | 1125 | 1830 | 2723 | 3463 | 4278 | 4963 | 5685 | 6250 | 7142 | 7724 | 8252 | 8866 | 9443 | |
| 0448 | 1156 | 1838 | 2741 | 3471 | 4322 | 4971 | 5688 | 6294 | 7159 | 7821 | 8257 | 8876 | 9463 | |
| 0451 | 1166 | 1873 | 2750 | 3481 | 4358 | 4981 | 5719 | 6340 | 7188 | 7835 | 8261 | 8878 | 9478 | |
| 0474 | 1172 | 1879 | 2752 | 3505 | 4372 | 4985 | 5726 | 6355 | 7189 | 7844 | 8272 | 8880 | 9479 | |
| 0482 | 1189 | 1882 | 2781 | 3540 | 4382 | 4998 | 5752 | 6363 | 7204 | 7851 | 8275 | 8885 | 9491 | |
| 0491 | 1200 | 1943 | 2794 | 3574 | 4387 | 5000 | 5755 | 6372 | 7214 | 7863 | 8311 | 8904 | 9493 | |
| 0499 | 1234 | 1944 | 2803 | 3693 | 4410 | 5021 | 5766 | 6382 | 7260 | 7876 | 8321 | 8926 | 9501 | |
| 0514 | 1235 | 1974 | 2810 | 3711 | 4412 | 5023 | 5768 | 6429 | 7294 | 7887 | 8323 | 8950 | 9521 | |
| 0553 | 1238 | 2063 | 2812 | 3712 | 4447 | 5052 | 5772 | 6480 | 7295 | 7894 | 8347 | 8951 | 9542 | |
| 0628 | 1262 | 2076 | 2824 | 3724 | 4448 | 5104 | 5777 | 6535 | 7298 | 7903 | 8348 | 8981 | 9557 | |

Check result with Official Gazette. Issued by : Director, Mizoram State Lotteries.


## सोनेरी कॉर्नर

### 'आरएक्स १००'च्या रिमेकमधून अहानचे पदार्पण

अभिनेता सुनील शेट्टीचा मुलगा अहान आता अभिनेता म्हणून बॉलीवूडमध्ये पदार्पणासाठी सज्ज झाला आहे. 'तडप' असे या चित्रपटाचे नाव असून चित्रपटाचा फर्स्ट लुक आणि पोस्टर तसेच प्रदर्शनाची तारीख अभिनेता अक्षय कुमारने मंगळवारी सोशल मीडियातून जाहीर केली. तेलगू चित्रपट 'आरएक्स १००'चा हा रिमेक आहे. मिलन लुथरिया यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. चित्रपटात अहानसोबत तारा सुतारिया मुख्य भूमिकेत आहे. २४ सप्टेंबर रोजी हा रोमँटिक अ‍ॅक्शन चित्रपट प्रदर्शित होणार आहे. दरम्यान, या आधी सुनील शेट्टीची मुलगी अथिया आणि सूरज पांचोली या जोडीला २०१५ मध्ये सलमान खानने 'हिरो' चित्रपटातून लाँच केले होते.

### वंडर मदर

डीसी कॉमिक्सच्या 'वंडर वुमन'मधून प्रसिद्धीच्या शिखरावर पोहोचलेली हॉलीवूड अभिनेत्री गॅल गॅडोट सध्या तिसर्‍यांदा आई बनण्याच्या मार्गावर आहे. या ३५ वर्षीय अभिनेत्रीने इन्स्टाग्रामवरून एक सुंदर फोटो शेअर केला आहे. यामध्ये गॅलचा पती आणि तिच्या दोन मुली यांनी बेबी बम्पवर हात ठेवलेला दिसत आहे. 'आम्ही पुन्हा एकदा' अशी कॅप्शन गॅलने दिली आहे. त्यानंतर या फोटोवर सेलिब्रिटी आणि नेटकर्‍यांच्या लाईक्स आणि शुभेच्छांचा पाऊस पडला आहे. 'वंडर वुमन १९८४'नंतर गॅल इजिप्तची शेवटची महाराणी क्लिओपात्रा हिच्यावरील बायोपिकमध्ये मुख्य भूमिकेत दिसणार आहे. 'वंडर वुमन १९८४' ची दिग्दर्शक पॅटी जेनकिन्स हीच या बायोपिकचे दिग्दर्शन करणार आहे.

आतापर्यंत न दिसलेली क्लिओपात्रा आम्ही या बायोपिकमधून दाखवणार आहोत, असे गॅलने म्हटले आहे.

### हरभजनची नवी इनिंग

क्रिकेटमधील यशस्वी कारकिर्दीनंतर आता हरभजन सिंग चित्रपटात चक्क मुख्य भूमिकेत दिसणार आहे. हरभजनचा पहिला तमिळ चित्रपट 'फ्रेंडशिप'चा टीझर नुकताच रीलिज करण्यात आला. तमिळ, तेलगू आणि हिंदी भाषेत हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात हरभजन कॉलेज युवकाची भूमिका साकारत असून अ‍ॅक्शन, रोमान्स, डान्स, कॉलेज लाईफ आणि क्रिकेट असा मसाला यात आहे. 'फ्रेंडशिप'शिवायही हरभजनच्या हातात अनेक चित्रपट आहेत. या आधी 'मुझसे शादी करोगी'मध्ये हरभजनने पाहुण्या कलाकाराची भूमिका केली होती.



### 'सायना' येणार २६ मार्चला

बॅडमिंटनपटू 'फुलराणी' सायना नेहवाल हिच्यावरील बायोपिक 'सायना' २६ मार्च रोजी थिएटर्समध्ये प्रदर्शित होणार आहे. परिणीती चोप्रा हिने या चित्रपटात सायनाची भूमिका साकारली आहे. 'स्टॅनले का डिब्बा', 'हवाहवाई' या चित्रपटांचे दिग्दर्शक अमोल गुप्ते यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. याच महिन्यात परिणीती आणि अर्जुन कपूरचा 'संदीप और पिंकी फरार' देखील प्रदर्शित होणार आहे.

### रॅम्बो

अभिनेता टायगर श्रॉफ 'गणपत'चे चित्रीकरण संपल्यानंतर 'रॅम्बो' या चित्रपटाच्या तयारीला लागेल. रोहित धवन या चित्रपटाचे दिग्दर्शन करत आहे. हा चित्रपट आधी यशराज स्टुडिओद्वारे बनवला जाणार होता. मात्र आता जिओ स्टुडिओतर्फे तो बनवला जात आहे. 'रॅम्बो'चे हक्क दिग्दर्शक सिद्धार्थ आनंदकडे आहेत. सिद्धार्थ या चित्रपटाचा निर्माता असून तो सध्या 'पठाण' चित्रपट पूर्ण करत आहे. सिद्धार्थ स्वतःच्या बॅनरतर्फे या चित्रपटाची निर्मिती करणार होता, मात्र जिओ स्टुडिओने स्वतःहून सिद्धार्थला पार्टनरशिपची तसेच इतरही बिग बजेट चित्रपटात गुंतवणुकीची ऑफर दिली. त्यामुळे आता जिओ स्टुडिओ 'रॅम्बो'ची निर्मिती करेल. दरम्यान, 'रॅम्बो' हा हॉलीवूड अभिनेता सिल्व्हेस्टर स्टॅलोनच्या १९८२ मध्ये प्रदर्शित झालेल्या याच नावाच्या चित्रपटाचा रिमेक आहे. स्टॅलोनच्या 'रॅम्बो'चे आतापर्यंत पाच भाग प्रदर्शित झाले आहेत.

### कार्तिकची ब्रेकिंग न्यूज

अभिनेता कार्तिक आर्यनने त्याच्या आगामी 'धमाका' चित्रपटाचा टीझर मंगळवारी रीलीज केला. हा चित्रपट थिएटर्समध्ये प्रदर्शित होणार नसून थेट नेटफ्लिक्सवर रिलिज केला जाणार आहे. चित्रपटात कार्तिकने अर्जुन पाठक ही व्यक्तिरेखा साकारली असून तो एका वृत्तवाहिनीमध्ये न्यूज अँकर आहे. यात अमृता सुभाषचीही महत्त्वाची भूमिका आहे. टीझरमध्ये वैतागलेला कार्तिक एक ब्रेकिंग न्यूज देण्याची प्रॅक्टिस करताना दिसतो. एका बॉम्बस्फोटाच्या बातमीच्या वार्तांकनावर हा सस्पेन्स थ्रिलर चित्रपट आधारित आहे. कार्तिकने या चित्रपटाचे शूटिंग केवळ १० दिवसांत पूर्ण केले होते. राम माधवानी यांनी चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. माधवानी यांनी यापूर्वी 'आर्या' ही डिस्ने प्लस हॉटस्टारवरील वेब सीरिज दिग्दर्शित केली होती.